**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक १६ जून २०२४**

**ठळक बातम्या**

1. **आकाशवाणीवरील 'मन की बात'च्या १११व्या भागातून ३० जूनला पंतप्रधान नरेंद्र मोदी साधणार श्रोत्यांशी संवाद.**
2. **एसटी प्रशासनातर्फे विद्यार्थ्यांसाठी "एसटी पास थेट तुमच्या शाळेत" ही विशेष मोहीम राबविली जाणार.**
3. **राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत क्षयरोग नियत्रंण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गोंदिया जिल्हा राज्यात अव्वल स्थानी.**

**आणि**

4. **येत्या काही तासांत नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता.**

*****

'मन की बात'

पंतप्रधान नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमाच्या १११व्या भागात येत्या ३० तारखेला देशवासियांशी संवाद साधणार आहेत. सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर मोदी यांचा 'मन की बात'चा हा पहिलाच कार्यक्रम आहे. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी आपले विचार आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकावर तसंच नरेंद्र मोदी ॲप किंवा माय gov खुल्या मंचावर येत्या २८ जूनपर्यंत कळवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे. 'मन की बात' कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून आकाशवाणी वृत्त विभागाच्या संकेतस्थळावरून आणि न्यूज ऑन एअर मोबाईल वरून प्रसारित केला जाईल. आकाशवाणी वृत्त विभाग, डीडी न्यूज, प्रधानमंत्री

कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यू ट्यूब वाहिन्यांवरून कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल. कार्यक्रमाच्या हिंदी प्रसारणानंतर लगेचच प्रादेशिक भाषांमधला अनुवाद प्रसारित होईल.

बकरी ईद

राज्यात उद्या बकरी ईदचा सण साजरा होणार असून त्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तयारी केली आहे. पशूंच्या तपासणीसाठी पशुसंवर्धन विभागातर्फे विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी ईद अल - अझा म्हणजेच बकरी ईद निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. ईद अल - अझा हा सण त्याग, करुणा आणि परोपकाराचा संदेश देतो. या सणा निमित्त उदात्त मूल्यांच्या जपणुकीसाठी प्रयत्न करण्याचा संकल्प करण्याचं आवाहन राज्यपालांनी संदेशात केलं आहे.

प्रफुल पटेल

येत्या विधानसभा निवडणुकीत आम्ही महायुतीत 85 ते 90 जागा मागणार आहोत अशी माहिती राष्ट्रवादी नेते प्रफुल पटेल यांनी आज दिली. गोंदियात आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. देशामध्ये नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये एनडीए ला अपेक्षित यश आलं नाही. महाराष्ट्रात देखील परिस्थिती वेगळीच राहिली. मात्र आता आगामी काळात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये परिस्थिती काहीतरी वेगळी राहील आणि चित्र बदलेल असं पटेल म्हणाले. दरम्यान, लोकसभा निवडणुकीमध्ये भंडारा-गोंदिया मतदारसंघातून काँग्रेसच्या विजयी उमेदवाराचं अभिनंदन करताना त्यांनी आता लोकांच्या समस्या दूर करायला पाहिजे, असा सल्ला पटेल यांनी यावेळी दिला.

एसटी पास थेट तुमच्या शाळेत

शाळा- महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना आता एसटीचे पास हे थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येणार आहेत. तशा सूचना एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला दिल्या आहेत. नवीन वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा आता सुरू झालेल्या आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून 66% इतकी सवलत दिली आहे,म्हणजे केवळ 33% रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचं वितरण केलं जातं. यासाठी विद्यार्थ्यांना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते. पण आता रांगेत ताटकळत राहण्याची गरज उरणार नाही. शाळा-महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून त्या विद्यार्थ्यांना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. या संदर्भात १८ जुन पासुन एसटी प्रशासनातर्फे" एसटी पास थेट तुमच्या शाळेत" ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितलं आहे. या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना होणार आहे.

मिफ्फ

१८ व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज दुसरा दिवस आहे. यंदा 'अमृतकाळातील भारत' संकल्पनेअंतर्गत ६ लघुपट

प्रदर्शित होणार आहे.  दरवर्षी, 'राष्ट्रीय स्पर्धा श्रेणी' अंतर्गत एक विशेष संकल्पना निवडली जाते. यंदा 'अमृतकाळातील भारत' अशी संकल्पना असून या अंतर्गत  अजय ध्वजा, ओनाके ओबाव्वा, एव्हरीवेअर, इंडिया होप्स २४, मोरिंगा, आणि बिगारी कामगार हे ६  लघुपट दाखविण्यात येणार आहे. या ६ चित्रपटांमधून रसिकांना भारताची वाटचाल, विकास आणि समृद्धीच दर्शन घडणार आहे. विजेत्याला ट्रॉफी आणि प्रमाणपत्रासह एक लाख रुपयांची रोख रक्कम दिली जाणार आहे.

पन्नालाल सुराणा

कोल्हापूरच्या  राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्या वतीने दिला जाणाऱ्या शाहू पुरस्काराची आज घोषणा करण्यात आली. यंदाचा राजर्षी शाहू पुरस्कार जेष्ठ समाजवादी नेते, विचारवंत आणि पत्रकार पन्नालाल सुराणा यांना प्रदान करण्यात येणार आहे. रोख रू. १ लाख, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. ट्रस्टचे अध्यक्ष जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

अंबाझरी जलपर्णी

शहरातील प्रसिद्ध अंबाझरी तलावात दिवसेंदिवस वाढत असलेली जलपर्णी जनसहभागातून काढण्याचा महत्वाकांक्षी निर्णय नागपूर महानगरपालिकेने घेतला आहे. या निर्णयाला नागपूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शवित स्वयंस्फूर्तीने पुढे येत आज श्रमदान केलं. ही मोहीम पुढील काही दिवस सतत सुरू राहणार असून, नागरिकांनी दिलेल्या उदंड प्रतिसादाबाबत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी नागपूरकरांचे आभार मानले आहे. अंबाझरी तलाव स्वच्छतेसाठी आज सकाळी नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येत श्रमदान केलं. मानवी साखळी तयार करून एकमेकांच्या हातात हात देत तलावातून जलपर्णी बाहेर

काढण्यात आली. जलपर्णी बाहेर काढण्याच्या कामासाठी मनपाद्वारे शेकडोंचे मनुष्यबळ तसंच 10 पोकलेन आणि जेसीबी मशीन, 20 टिप्पर, पाण्यातील बोट, जलदोस्त मशीन अशी यंत्र सामग्री लावण्यात आली होती.

क्षयरोग नियत्रंण

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील ग्रामीण व शहरी भागात गोंदिया जिल्ह्याने क्षयरोग नियत्रंण कार्यक्रम प्रभाविपणे राबविण्यात राज्यात अव्वल क्रमांक मिळवला आहे. राज्यातील सर्व जिल्ह्याचे केंद्र सरकारने दिलेल्या निर्देशकानुसार क्षयरोग कार्यक्रमा मध्ये केलेल्या कामानुसार रैंकिंग केले जाते. त्या मध्ये राज्यात गोंदिया जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. नुकत्याच पुणे इथं झालेल्या राज्यस्तरावरील विशेष आढावा बैठकीत सहसंचालक कुष्ठरोग-क्षयरोग तथा राज्य क्षयरोग अधिकारी डॉ.संदीप सांगळे व केंद्रीय क्षयरोग कन्सल्टंट डॉ.धर्मा राव यांच्या हस्ते गोंदियाचे जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांना सन्मानित करण्यात आलं.

पालकमंत्री संजय राठोड

'खरीप हंगाम तोंडावर आला आहे, परंतू त्या मानाने पिककर्जाचे वाटप कमी झाल्याचे दिसते. या महिन्याअखेर 75 टक्के पेक्षा अधिक कर्जाचे वाटप झाले पाहिजे. तसंच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने बिगर शेती कर्जाची वसूली वाढवून त्यातून शेतकऱ्यांना पिककर्ज वाटप करावे,' अशा सूचना यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी काल आढावा बैठकीत केल्या. जिल्ह्याला यावर्षी 2 हजार 200 कोटी रुपयांच्या पिककर्ज वाटपाचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी आतापर्यंत 1 हजार 26 कोटींचे वाटप झाले असून वाटपाची टक्केवारी 47 टक्के इतकी आहे.

वैद्यकीय मदत कक्ष

निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत उपचार मिळवून देण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधि-न्याय विभाग अंतर्गत विशेष राज्यस्तरीय वैद्यकीय मदत कक्ष सुरु केला असून या कक्षाच्या माध्यमातून कॅन्सर, लिव्हर-किडनी, बोनमॅरो ट्रान्सप्लांट सारख्या गंभीर आजार असणाऱ्या २५८ रुग्णांच्या शस्त्रक्रिया करुन त्यांना नवीन जीवनदान देण्यात आलं आहे. आजवर या शस्त्रक्रियांसाठी १७ कोटी ६९ लाख रुपयांची मदत या कक्षाच्या माध्यमातून देण्यात आली आहे.

हवामान

येत्या काही तासांत नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्यानं वर्तविली आहे. त्याचप्रमाणे यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान गोंदिया जिल्ह्याच्या आमगाव व सालेकसा तालुक्यात काल सायंकाळी जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात झाडांची पडझड झाली, विद्युत तारा तुटल्या, काही ठिकाणी घरावरील छत उडाल्याने  नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

******